# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० / २६३३३३३९ Website - www.barti.in E-mail: - dg@barti.in


## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ.मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक – युवतींसाठी **नंदुरबार जिल्ह्याकरीता विद्यार्थ्यांना आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व तत्सम पदांच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी नि:शुल्क अनिवासी** प्रशिक्षणाकरीता १ जिल्ह्याच्या ठिकाणी खालील नमूद प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. करिता पात्र उमेदवारांकडून दिनांक **०५ डिसेंबर, २०२३** पासून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव व जिल्ह्याचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १. | प्रबोधन बहुउद्देशीय संस्था संचलित स्पेक्ट्रम ॲकॅडमी, नंदुरबार | ७५ |
| २. | युनिक ॲकॅडमी, नंदुरबार | ७५ |
| | एकूण | १५० |

**पात्रता :**

१) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा.
२) उमेदवाराचे वय वर्ष १८ ते ३४ पर्यन्त असावे.
३) उमेदवार किमान १२ वी उत्तीर्ण असावा.
४) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.
५) उमेदवार दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा दाखला सांक्षाकित प्रत सादर करावी.

**अर्ज करण्यासाठी QR scan करा**

**विद्यार्थी निवडीचे निकष :**

- एकूण प्राप्त अर्जातील उमेदवारांची चाळणी परीक्षेद्वारे गुणवत्ता यादी नुसार निवड करण्यात येईल.
- पात्र उमेदवारांची उत्पन्न मर्यादा रु.८ लाखांपर्यत असावी.
- चाळणी परीक्षेचे स्वरूप :- संबंधित पूर्व प्रशिक्षण आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदांच्या परीक्षेच्या धर्तीवर असेल.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव
- ४ % जागा दिव्यांगाकरीता राखीव
- ५% जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग,मादगी,इ.)

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख २०/१२/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी – ०६ महिने (अनिवासी)
- निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान ७५% टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्यास त्या प्रशिक्षणार्थीना दरमहा रु.६,०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
- निवड झालेल्या पात्र प्रशिक्षणार्थाना पुस्तक संचाकरीता प्रती प्रशिक्षणार्थी रु.५०००/- एवढी रक्कम अदा करण्यात येईल.
- सदर योजनेबाबत / प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे सर्व अंतिम अधिकार मा. महासंचालक, बार्टी यांना राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

**अर्ज करण्याची अंतिम दिनांक व ऑनलाईन अर्ज करण्याकरिता लिंक**

इच्छुक व पात्र उमेदवारांनी **दि.२०/१२/२०२३** पासून https://forms.gle/qfWCriLomPZhGB2a7 या लिंकवर ऑनलाईन अर्जाची नोंदणी करावी.

5/12/23

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**